# प्रस्तावना :-

पोलिसांना आपली कर्तव्य पार पाडण्यासाठी विविध विभागात काम करावे लागते त्यातीलच एक भाग म्हणजे कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नेहमी पोलिसांना जनतेबरोबर बैठकांचे आयोजन करायला लागते अशा प्रसंगी पोलिसांची भूमिका व कायदा या दोघांचा समन्वय साधून जनतेचे हित कशामध्ये आहे हे सांगण्यासाठी समाजव्यवस्थेतील एक प्रभावी माध्म्म म्हणुन पोलीस आणि जनता यांच्या मीटिंग आयोजन केले जाते. भारतीय राज्यघटनेने भारतीय समाजाला मूलभूत हक्क दिलेले आहे त्याप्रमाणे प्रत्येकाला त्याच्या त्याच्या धर्माचा प्रसार रूढी परंपरा मिरवणुका ह्या काढण्याचा सण-उत्सव साजरे करण्याचा अधिकार दिलेला आहे तसेच राज्यघटनेने ठरवून दिल्याप्रमाणे सार्वत्रिक निवडणुका ह्या पाच वर्षांनी घेतल्या जातात या सर्व धार्मीक सण उत्सव व निवडणुका शांततेत पार पाडाव्यात लागतात या साठी जनतेमध्ये कायद्याप्रती दृढ विश्वास निर्माण करुन पोलीसांची भुमीका निपक्षपाती कशी आहे हे जनतेला सांगावे लागते. व जनतेकरवी विश्वास संपादन करावा लागतो.

**पोलीसांनी जनतेसमोर मिटींगमध्ये जातांना खालील प्रमाणे आपले आचरण व भुमीका ठेवल्यास जनतेचा विश्वास संपादन केला जावुन कायदा आणि सुव्यवस्था राखणेकामी निश्चीत मदत होईल.**

1) **स्वच्छ प्रतिमा :-** पोलीस दलातील प्रत्येक सदस्याला जनतेने त्यांचा सेवक व रक्षणकर्ता असे समजले पाहीजे. अशी भुमीका असावी.
2) **सदरक्षणाय खलनिग्रहणाय :-**दुर्जनांच्या निर्जननासाठी सदैव्य् तत्प्र व सामान्य जनतेच्या रक्षणासाठी नेहमी हजर अशी वर्तनुक नेहमी जनतेसमोर ठेवावी
3) **तत्परता :-** नैसर्गीक आपत्ती व महापुर अशा प्रसंगी तात्काळ मदतीसाठी धावणे
4) **सौजन्य्शिल वागणुक :-** सामान्य जनतेशी बोलातांना आदरयुक्त शब्द वापरावे,
5) **निपक्षपातीपणा :-** जनतेसामोर आपण फक्त पोलीसच आहोत, कोणत्याही जाती धर्म पंथाचे नाही. असे वर्तन केल्यास जनतेचा विश्वास संपादन केला जातो.
6) **प्रामाणीकपणा :-** पोलीस कर्तव्य करत असतांना उदा. मौल्यवान दागीने बेवारस मिळाल्यास ते जनतेस परत केल्यास विश्वास निर्माण होतो.
7) **धार्मीक नेते :-** वेगवेगळया धार्मीक उत्स्वाचे वेळी व कायदा – सुव्यवस्था राखतांना पोलीसांचा अनेक वेळी धार्मीक नेत्यासोबत संबध येतो, त्यांचेशी सौजन्यशिल वर्तन असावे.
8) **सामाजीक संघटना :-** विविध अराजकीय व सामाजीक संघटना यांचेशी सौजन्यशिल वागल्याने आपत्कालीन परिस्थीतीमध्ये पोलीसांना मदत करतात.
9) **शेतकरी कामगार :-** यांचे आंदोलन हाताळतांना सामाजास्याची भुमीका ठेवावी.
10) **विद्यार्थी :-** विद्यार्थ्यांचा संबध शैक्षणीक आंदोलन या प्रसंगी पोलीसांनी संवेदनशिलपणे व्यवहार केला पाहीजे.

# पोलीसांना जनतेच्या मिटींगा आयोजीत करण्याचे प्रसंग

1) **जातीय दंगली :-** सध्या सोशल मिडीयाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. कुणीतरी समाजकंटक अक्षेपार्ह पोस्ट टाकुन धार्मीक व जातीय भावना भडकवितात. अशा प्रसंगी वेळीच दखल घेवुन कायदेशिर उपाय करुन संबधीतांवरती कार्यवाही केली आहे. अफवांवरती विश्वास ठेवु नये. असा जनतेमध्ये विश्वास संपादन करणेसाठी विविध जाती धर्माच्या लोकांच्या एकत्रपणे मिटींगांमध्ये त्यांना वस्तुस्थितीची जाण करुन देवुन शांततेचे आवाहन करावे. प्रसंगी सदर समाजातील धार्मीक नेते. यांनाही भेटुन शांततेचे आव्हान करावे.
2) **अचानक उद्भवलेल्या दंगली क्षमल्यानंतरच्या मिंटींग :-** यामध्ये समाजातील गरीब जनतेचे आतोनात नुकसान झालेले असते. समाजकंटकावरती दाखल केलेले गुन्हे त्यांना अटक करणे, प्रतिबंधक करणे, योग्य् बंदोबस्त् नेमणे, व जनता हि सुरक्षीत आहे अशी भावना त्यांचेमध्ये निर्माण करणे व सामाजीक एकोपा तयार करणे यासाठी प्रयत्न् करणे
3) **मा. सर्वोच्च् न्यायालयाचे न्यायनिवाडे :-** अशा प्रसंगी जनतेमध्ये न्यायालयाप्रती आदर व विश्वास असतो. त्यास तडा न जाव देता योग्य् बंदोबस्त् नेमुण सामाजीक एकोपा राहील यासाठी विविध धर्मातील धर्मगुरु, मौलवी, फादरी, यांचा विश्वास संपादन करणे जेणे करुन कायदा – सुव्यवस्थेचा प्रश्न् निर्माण होणार नाही. अशी सकारात्मक भुमीका मांडावी. उदा. रामजन्मभुमी वाद,
4) **अफवा :-** महाराष्ट्र राज्यात नुकताच धुळे जिल्हयामध्ये मुले पळवणारी टोळी आली आहे. अशा अफवांवरुन निदोष नागरीकाची जमावाने ठेचुन हत्या केली. तसेच पालघरमध्ये दरोडेखोर आले म्हणुन जनतेने निर्दोष साधुंची हत्या केली. मुले पळवणारी टोळी फिरत आहे. अशा अफवांचे पेव फुटले होते. अशा प्रसंगी पोलीसांनी गावोगावी जावुन मिटींगा घेवुन पोर चोरणारी टोळी कार्यरत नाही. ती अफवा आहे. अशी जनजागृती केली. तेव्हा अफवामुळेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न् निर्माण होतो.
5) **सार्वजनिक निवडणुका :-** सार्वजनिक निवडणुका निपक्षपाती व मोकळया वातावरणात पार पडाव्या म्हणुन पोलीसांना विविध राजकीय पक्ष, त्यांचे प्रतिनिधी

यांचे दरम्यान मिटींगांचे आयोजन केले जाते. अशा प्रसंगी पोलीसांनी आपली भुमीका निपक्षपाती ठेवली पाहीजे. कोणत्याही एका पक्षाचे काम करु नये. जेणे करुन पोलीसांच्या भुमीकेबद्दल जनतेत संभ्रम निर्माण् होणार नाही. निपक्षपातीपणे काम करावे.

6) **अंतरजातीय विवाह :-** हिंदु – दलीत मुस्लीम असे मुले मुली पळुन जावुन अंतरजातीय विवाह करतात. अशा प्रसंगी दोन समाजामध्ये तेढ निर्माण होवुन याचा आदोलनाचा भाग हा राज्यपातळी इतका मोठा होतो. म्हणुन वेळीच सदर समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींना विश्वासात घेवुन पोलीसांची भुमीका मांडावी व कायदा व सुवव्यवस्थेचा प्रश्न् निर्माण होणार नाही यांची दक्षता घ्यावी.

7) **सण उत्स्व व धार्मीक मिरवणुका, जयंती :-** अशा प्रसंगी मोठ्या प्रमाणात मिटींगांचे आयोजन करावे लागते. 1) गणेशोत्स्व, 2) दुर्गाउत्स्व, 3) मोहंमद पैगंबर जयंती, 4) रमजान, 5) मोहरम, 6) रामनवमी, 7) शिवजयंती, 8) अंबेडकरजयंती

8) **जातीय सलोखा :-** 1) शांतता कमीटी, 2) मोहल्ला कमीटी 3) ग्रामसुरक्षा दल 4) महात्मागांधी गांव तंटामुक्ती योजना, 5) पोलीस मित्र

# पोलीसांनी मिटींगचे आयोजन करतांना खालील मुद्यांचा विचार करावा

1) मिटींगची वेळ व ठिकाण वादरग्रस्त् नसावे. कोणाचीही धार्मीक भावना दुखावणार नाही याची काळजी घ्यावी.
2) मिटींग प्रसंगी व्यासपिठावर सर्व जातीधर्माचे लोकांना स्थान द्यावे
3) मिटींगसाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी वेळेत पोहचावे.
4) समाजकंटक किंवा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना मिटींगमध्ये आमत्रीत करु नये.
5) मिटींगमध्ये मांडण्याचे विषय हे सार्वजनिक हिताचे असावे. वैयक्तीक नसावे. अशी भुमीका मांडण्याबाबत वक्त्यांना सांगावे.
6) मिटींग प्रसंगी मिटींगमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न् निर्माण होणार नाही. यासाठी योग्य् बंदोबस्त् नेमावा.
7) कायदा व सुव्यवस्थेचा प्रसंग निर्माण झाला असता परंतु ज्या जागरुक नागरीकाने वेळीच पोलीसांना कळविले. त्यामुळे जातीय तेढ निर्माण होण्याआधिच पोलीस पोहचले आणि शांतता प्रस्थापीत केली. अशा जागरुक नागरीकांचा शांतता कमीटीच्या मिटींगमध्ये यथोउचीत पोलीस खात्यामार्फत गौरव करावा. त्यामुळे जनतेला प्रोत्साहन मिळुन पोलीसांची प्रतीमा उंचावते.
8) विविध धर्मीयांच्या मिरवणुका प्रसंगी परंपरा व रुढी यानुसार दिलेल्या मार्गानेच मिरवणुकाना परवानगी द्यावी नविन मार्ग देवु नये. यासाठी पुर्वीच्या दाखल्याचा संदर्भ देवुन पोलीसांची भुमीका ठाम मांडावी.
9) विविध धर्मीयांचे लोकांना मिरवणुका प्रसंगी एकमेकांचा आदरसत्कार करण्यासाठी पोलीसांच्या सयुकत विद्यमानाने पुढाकार घेवुन जातीय सलोखा निर्माण करावा.

# घटना

**पार्श्वभुमी :-** जळगांव जिल्हयातील चोपडा शहर पोलीस ठाणे जातीय दृष्ट्या संवेदनशिल असुन जनसंख्या 60 टक्के हिंन्दु व 40 टक्के मुस्लीम अशी असुन प्रत्येक मिरवणुक मशिद असलेल्या मार्गानेच मार्गक्रमण होत असते. बाब हि हिन्दु - मुसलमान यांचेपुरतीच नसुन मुस्लीमामध्ये दोन गट असुन एक सुन्नी व दुसरा तबलिकी जमात असे दोन मतप्रवाह आहेत. सन 2011 पर्यंत या दोन्ही मतप्रवाहातील मुस्लीम बांधव हे तबलिकी जमातीच्या मौलनाच्या नेतृत्वाखाली इदगाह येथे नमाज पठण करत असे.

**घटनेचे वर्णन :-** रमजानईद 2011 इदगाह मैदान चोपडा येथे सकाळी 9:00 वा. नमाज पठणाच्या कार्यक्रमासाठी 15 ते 16 हजार मुस्लीम बांधव जमले होते. नमाज सुरु होणेसाठी अवधी होता. त्यावेळेस शांतता कमीटी चे एक मुस्लीम समाजाचे सदस्य् हे मिटींगला हजर होते. त्यांनी तात्काळ भ्रमणध्वनीव्दारे पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना कळविले की, नमाजचे वेळेस दोन समाजामध्ये मौलाना कोन नमाज पठण करणार यावरुन मोठा वाद होणार आहे. अशा माहीतीवरुन तात्काळ आर.सी.पी. प्लाटुनसह इदगाह येथे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोहचले. माहीतीप्रमाणे सुन्नी आणि तबलिकी यांचेमध्ये घोषणायुध्द सुरु झाले. पोलीसांनी समयसुचकता पाहुन इदगाह येथील माईक ताब्यात घेतला व मुस्लीम बाधवांना एक भावनीक अहवान केले. अल्लाह एक असुन मतप्रवाह वेगळे जरी असले तरी प्रार्थना संपल्यानंतर मार्ग काढु आता व्तय नको. तरीही काही अक्रमक मुस्लीम बांधवानी सुन्नी समाजाचा मौलवीच अगोदर नमाज पठण करेल असा अट्टाहास धरला. तेव्हा तबलिकी जमातीकडुन नमाजाचे हक्क प्रदान केल्याचा इंग्रज काळातील ताम्रपट हजर केला. सदर ताम्रपट हा शासनाचा आहे असे त्यांना सांगीतले. व तबलिकी जमात पहीले नमाज पठण करेल असे सांगण्यात आले. यावर संमती झाल्याने पहील्यांदा तबलिकी जमातीने नमाज पठण केले. त्यानंतर सुन्नी जमातीने नमाज पठण केले.

नमाज संपल्यानंतर दोन्ही समाजातील मौलवीण् एहलेकार सामजीक नेते यांची मिटींग चोपडाशहर पोलीस स्टेशन येथे बोलावीली मिटींगमध्ये सुन्नी समाजाने सांगीतले

की, 17 मशिदी पैकी 15 मशिदी सुन्नीच्या आहेत. व दोन तबलिकींच्या आहेत. त्यामुळे पुढील वर्षापासुन नमाजाचा पहीला हक्क सुन्नींनाच मिळाला पाहीजे. असा होरा त्यांनी धरला. तबलिकी जमातही ऐकत नव्हते. यात पोलीसांनी ताम्रपट हा इंग्रज काळातील सरकारी दस्ताऐवज आहे. त्याचे विरोधात निर्णय करता येणार नाही. असे समजाविले व दोन्ही जमातीच्या लोकांकडुन एका साध्या कागदावरती लिहुन घेणार व लिहुन देणार अशांची नावे घालुन साक्षीदार, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व गोपनिय कर्मचारी असा लेख लिहीला. त्यात तबलिकी जमातीचे लोक नदीच्या पलीकडुन 8:15 वा. येतील व 8:45 वा. इदगाह मैदान नमाज पठण करुन खाली करतील. व नंतर 8:45 ते 9:30 वा. पावेतो सुन्नी जमातीचे लोक नदीकडच्या अलीकडच्या नमाज पठणाकरीता येतील व नमाज पठण करुन निघुन जातील असा लेख लिहुन त्याची भाग – 4 मध्ये मध्ये नोंद करण्यात आली. व जसे कोणी याचा भंग करीतल त्यावर कायदेशिर कार्यवाही केली जाईल. असे सांगण्यात आले.

सदर मिटींगचा परीपाक म्हणुन आज सन 2020 पावेतो ठरवुन दिल्याप्रमाणे व लिहीलेल्या लेखा प्रमाणे मुस्लीम समाजातील दोन मतप्रवाहमध्ये इदगाह येथे विनावाद नमाज पठण केले जाते.

यात पोलीसांची समांजस्य् भुमिका व जनतेला वाटणारा त्यांचा प्रती दृढ विश्वास यामुळेच हे शक्य झाले आहे. कुठल्याही न्यायालयाचा न्यायनिवाडा नसतांना आजपावेतो विनातक्रार इदगाह येथे नमाज पठण सुरु आहे.